# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 08/03/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## डीझेल चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दि. ०७/०३/२०२४ रोजी पोलीस ठाणे मौदा येथे डिझेल चोरी संदर्भात अप क्र. २७८/२४ कलम ३७९ भादवी. अन्वये अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध करीता गुन्हे प्रगटीकरण पथक हे पो.स्टे. परीसरात अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना टोल प्लाझा माथणी येथील सिसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता डिझेल चोरी करणारा ट्रक क्र. MP-07/HB-2760 हा असल्याचा संशय आल्याने नमुद ट्रकचा परीसरात शोध घेत असतांना मुखबीरव्दारे माहिती मिळाली की, सदर ट्रक हा महादुला फाटा भंडारा ते नागपुर रोडचे कडेला संशयीतरित्या उभा आहे. यावरुन सदर ट्रकचा शोध घेवुन ट्रकची झडती घेतली असता ट्रकचे कॅबीन मध्ये **आरोपी नामे – जहीर सहीद खॉ, वय ४५ वर्षे, रा. गडरोली ता. मकशी, जि. साजापुर (म.प्र)** मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन ट्रकची पाहणी केली असता कॅबीन मध्ये डिझेल चोरी करीता वापरण्यात येणारे लोखंडी पाना, लोखंडी कटौनी., व प्लॅस्टीक पाईप तसेच एक लोखंडी तलवार तसेच ट्रकचे डाल्यामध्ये प्रत्येकी ३५ लिटर क्षमतेच्या ०९ प्लास्टीक कॅन मधील ३१५ लिटर डिजल व १० खाली प्लास्टीक कॅन तसेच आरोपीचा मोबाईल फोन असा एकंदरीत किंमती १०,४३,४३२/– रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करुन आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आलेली असुन आरोपीकडे गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रा. श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, पोलीस हवालदार संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, पोलीस नायक दिपक दरोडे, पोलीस अंमलदार शुभम ईश्वरकर अतिश गाढवे यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर